जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

कार्यालयाचा पत्ताः सर्व्हे नं.488, जिल्हा परीषद कार्यालया समोर, जालना, पिन कोड – 431203
प्रबंधक जिल्हा न्यायालय जालना दूरध्वनी क्र.: 02482 – 225053 व 02482 – 225451,
ई मेल आयडी : mahjaldc@mhstate.nic.in

जा.क्र./जि.न्या./वित्त/ 3812 /2026, दिनांकः 09.07.2026

निविदा / दरपत्रक

जिल्हा न्यायालय, जालना व जालना जिल्हयाच्या अंतर्गत येत असलेल्या सर्व न्यायालयांमध्ये एकूण 14 बायोमेट्रीक मशीन ॲप्लीकेशनसह खरेदी करणे व ते कार्यान्वीत करण्यासाठी निविदा/दरपत्रक मागवित आहे.

01. मा.जिल्हा व सत्र न्यायालय, जालना	02	नग	(ॲप्लीकेशन – 01)
02. मा.जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, अंबड	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
03. मा.दिवाणी न्यायालय व.स्तर जालना	02	नग	(ॲप्लीकेशन – 01)
04. मा.दिवाणी न्यायालय व.स्तर अंबड	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
05. मा.मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, जालना	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
06. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, अंबड	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
07. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, परतूर	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
08. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, भोकरदन	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
09. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, जाफाबाद	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
10. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, मंठा	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
11. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर, बदनापूर	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)
12. मा.दिवाणी न्यायालय क.स्तर,घनसावंगी.	01	नग	(ॲप्लीकेशन – 01)

उपरोक्त न्यायालयांकरीता एकूण 14 बायोमेट्रीक मशीन व त्याचे 12 ॲप्लीकेशन खरेदी करुन ते कार्यान्वीत करणेसाठी सदरील पुरवठादाराने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर "बायोमेट्रीक मशीन खरेदीसाठीचे दरपत्रक" असे नमूद करुन "मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना यांचे नावे दिनांक 21.07.2026 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. सदरची जाहीरात जिल्हा न्यायालय, जालनाच्या संकेतस्थळावर (https://jalna.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

आदेशान्वये,

9/7/26

प्र.प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना.

/home/ubuntu/1Dist Court Jalna/Purchase Commitee/Biometrix.odt

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना.

निविदा नुसार 14 बायोमेट्रीक मशीन ॲप्लीकेशनसह खरेदी करण्याच्या दरपत्रकासाठी खालील नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01)	प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक दाखल करण्याची परवानगी असेल.
02)	या कार्यालयाच्या अटीं व शर्तींची तसेच नमुद गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येईल.
03)	निविदाकाराला अधिकृत पुरवठादाराने त्याचे लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी कमांक, बँकेचा खातेकमांक नमुद करणे बंधनकारक राहील. सोबत आस्थापना व दुकाने अधिनियम परवाना प्रमाणपत्राची, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत दाखल करावी.
04)	दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर आकार/चार्जस् जसे की, बायोमेट्रीक मशीन, त्याचे ॲप्लीकेशन, किमान 1 तासाचे बॅटरी बॅकअप, ती नेटवर्क मध्ये जोडणे, यूएसबी पोर्टची सुविधा इ. साठी लागणा–या खर्चाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.
05)	दरपत्रक सादर करणा–या निविदाकाराचा खरेदी कार्यालयाशी कोणताही हितसंबंध नसावा. तसेच निविदाकार हा जालना जिल्हयाच्या आसपास अंदाजे 150 कि.मी.च्या परीसरातील असावा. जेणे करुन भविष्यात मशीनमध्ये काही तांत्रीक बिघाड झाल्यास किंवा काही अडचण भासल्यास ती तात्काळ दूर करता येईल.
06)	सदरील मशीन ही दर्जेदार नामांकीत कंपनीची असावी. बायोमेट्रीक मशीन लाईट गेल्यानंतरही चालण्यासाठी त्यासोबत/त्यात बॅटरी बॅकअपचा समावेश असावा. सदरील मशीन बाबत कमीत कमी दोन वर्षाच्या गॅरंटी, वॉरंटीचा उल्लेख करावा. वॉरंटी कालावधीत मशीन काही बाबत तकार नोंदविल्यानंतर ती 48 तासांचे आत पुरवठाधारकाने ती दुरुस्ती/बदलून द्यावी त्यासाठी लागणारा खर्च हा पुरवठाधारकास सहन करावा लागेल.
07)	निविदा मंजूर झाल्यानंतर व आदेश निर्गमित केल्यानंतर बायोमेट्रीक मशीन जालना जिल्हयातील सर्व न्यायांलयामध्ये प्रस्थापीत करुन द्याव्या लागतील व त्या सुस्थीतीत सुरळीत चालू असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधीत न्यायालयाकडून प्राप्त करुन घेवून ते देयकासोबत दाखल करावे. सर्व पडताळणी झाल्यानंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

08)	दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही दिनांक 21.07.2026 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.
09)	सदरील दरपत्रके पाठवितांना ती "मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर "बायोमेट्रीक मशीन खरेदीसाठीचे दरपत्रक" असा उल्लेख करावा.
10)	सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सर्व्हे नं.488, अंबड रोड, जालना या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.
11)	सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष उघडण्यात येतील. सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.
12)	उपरोक्त साहित्य खरेदी बाबत आदेश दिल्यानंतर आठ दिवसांच्या आत सुस्थितीत आणणे, बसविणे व ते कार्यान्वीत करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधीत पुरवठादाराची राहिल. आदेशानुसार पुरवठा न केल्यास किंवा अटींचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी कोणतीही सबब न देता पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, जालना यांना राहील.

आदेशान्वये

प्र.प्रबंधक,

दिनांक: 09.07.2026

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय

जालना